UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

● वर्ष : ९२ ● मार्च २०२४ ● पुरवणी विशेषांक ०८




प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे

२२. **Evolution of Data : From Data Analysis To Artificial Intelligence**

- 1. S. S. Patil, 2. G. D. Satpute ---------- १०७

२३. **Post Colonialism In Judith Wright's poem Bora Ring**

- Ms. Shubhangi Nivrytti Lavate ---------- १११

२४. **Tribal Movementsreflected in Louise Erdrich's 'Tracks'**

- Mr. Shinde Santosh Laxman ---------- ११३

२५. **वंचितांच्या शैक्षणिक, ग्रंथालयीन व समाज चळवळीचा आधार : कर्मवीर भाऊराव पाटील**

- प्रा. डॉ. बिरू ज्ञानू राजगे ---------- ११७

२६. **सार्वजनिक ग्रंथालय चळवळ : एक आढावा**

- सौ. जिरगे आशा चंद्रशोक ---------- १२१

२७. **कामगार चळवळीतील व्यक्तींचे योगदान**

- डॉ. मोहन गोविंद लोंढे ---------- १२५

२८. **उत्तम कांबळे यांच्या कथेतील वंचितांचे जीवन**

- डॉ. मगदूम बळवंत मारुती ---------- १३०

२९. **वंचित समाजातील स्त्रियांचा वांग्मयीन हुंकार म्हणजे दलित, आदिवासी स्त्रियांची कविता**

- डॉ. सर्जेराव पद्माकर ---------- १३

३०. **ग्रामीण स्त्रियांवरील अत्याचाराचे स्वरूप, कारणे व उपाय**

- १) प्रा डॉ. दिलीप महादू कोने २) प्रा. स्वाती प्रभाकर मगदूम ---------- १३

३१. **'झोपडपट्टी' कादंबरीतील वंचितांचा भाषिक व्यवहार**

- प्रा. डॉ. आर. डी. कांबळे ---------- १४

३२. **मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील वंचित दलितांचे जातभान**

- प्रा. मोहन बाबुराव चव्हाण ---------- १४

३३. **दिनेश काळे यांच्या कादंबरीतील स्त्री-प्रतिमा**

- १) प्रा. स्वाती प्रभाकर मगदूम २) प्रा.डॉ.दिलीप महादू कोने ---------- १४

३४. **शिक्षक भरती प्रक्रिया सद्यस्थिती**

- १) प्रा. सुनिता भारत थोरबोले २) प्रा.डॉ.दिलीप महादू कोने ---------- १

ISSN No. 2394-5990

# शिक्षक भरती प्रक्रिया सद्यस्थिती

**१) प्रा. सुनिता भारत थोरबोले**
मराठी विभाग ,डॉ.पतंगराव कदम
महाविद्यालय ,रामानंदनगर (बुर्ली )
ता.पलूस,जि.सांगली-४१६३०८.
ई मेल - sunitapatil251084.sk@gmail.com
भ्रमणध्वनी - ९३२५४११७३४

**२) प्रा.डॉ.दिलीप महादू कोने**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
डॉ.पतंगराव कदममहाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली )
ता.पलूस ,जि.सांगली -४१६३०८
ई मेल - dilipkone02@gmail.com
भ्रमणध्वनी - ९९२२८८५१८६

**प्रस्तावना :**

आज संपूर्ण भारत देशातून लाखो विध्यार्थी एक शिक्षक होण्याचे स्वप्न पाहतात.येणाऱ्या पुढील पिढ्यांना पंख देवू पाहतात.इतकंच नव्हे ,तर त्या पंखाना बळ देऊन गगनात उंच भरारी मारण्याचं कसब शिकवतात.

शिक्षण हा भारतातील प्रत्येक नागरिकांचा मूलभूत हक्क आहे आणि या हक्कापासून आपल्याला कोणीच वंचित ठेवू शकत नाही.त्यासाठी शासनाने सहा ते चौदा वयोगटातील सर्व मुलांसाठी शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे.जर देश घडवायचा असेल तर देशातील बालकांना शाळेतूनच चांगल्या दर्जाचे शिक्षण द्यायला हवे.त्यातूनच डॉक्टर,वकील, इंजिनिअर, शास्त्रज्ञ, आधुनिक शेतकरी, संशोधक, व्यावसायिक, उद्योगपती, पुढारी हे सर्व घडत असतात.त्यामुळे आपल्या देशाचा विकास होण्यास मदत होत असते.पण जर मूळ पायाच भक्कम नसेल तर उद्याची घडणारी पिढी बर्बाद व्हायला वेळ लागणार नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते , शिक्षण हेच सामाजिक क्रांतीचे साधन आहे.शिक्षणाच्या अभावाने माणूस गुलाम होण्यास वेळ लागत नाही. म्हणून शासनाने सक्तीचे आणि मोफत शिक्षण दिले पाहिजे.

या सर्व परिस्थितीचा विचार करता शिक्षण ही पाचवी मूलभूत गरज आहे. म्हणजेच अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य यांच्याइतकंच शिक्षणही अनन्य साधारण महत्वाचं आहे आणि ते शिक्षण विद्यार्थ्यांना देणारा शिक्षक हा घटक देखील तितकाच महत्वाचा आहे.त्याच शिक्षकांना सेवेत कायम करायला शासन टाळाटाळ करत आहे.

महाराष्ट्रात २०२०-२१ साली १, १०, ११४ इतक्या सरकारी व खाजगी शाळा आहेत. तर २०२१-२२ साली १,०९,६०५ म्हणजेच ५०९ शाळा बंद झाल्या.

एकीकडे मुलाला शिक्षकाची नोकरी आहे म्हंटलं की, आई-वडील आपली मुलगी द्यायला लगेच तयार होतात, पण आजच्या काळाचा विचार केला तर शिक्षकाची नोकरी मिळवणं म्हणजे बारा वर्षांची तपश्चर्या करून एखादा वर मिळवणं असंच काहीसं होवून गेलंय.

**शिक्षक भरतीची पारंपरिक पद्धत :**

पूर्वीच्या काळी दहावी झाली की ,लगेच शिक्षकाची नोकरी मिळायची.त्यापुढच्या काळात बारावीनंतर शिक्षकाची नोकरी मिळू लागली.मग दहावीनंतर डी.एड (डिप्लोमा इन एज्युकेशन) म्हणजेच शिक्षक पदविकेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर शिक्षकाची नोकरी मिळू लागली.अगोदर दहावीनंतर डी.एड केलं जायचं , त्यापुढे जाऊन बारावी नंतर डी.एड केलं जाऊ लागलं. डी.एड प्राथमिक वर्गांकरता मर्यादित असल्याने माध्यमिक वर्गांकरिता बी.एड. (बॅचलर ऑफ एज्युकेशन) शिक्षण पदवी अभ्यासक्रम पूर्ण करावा लागत असे. तसेच शिक्षण पदविकेच्या विद्यार्थ्यांना जे शिकवतात त्या शिक्षकांना एम.एड. (मास्टर ऑफ एज्युकेशन) पूर्ण करावे लागत असे. त्या काळात हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर लगेच नोकऱ्या मिळत असत.

हळूहळू लोकसंख्या वाढत गेली. समाजाचा शिक्षकाकडे बघण्याचा दृष्टिकोण सकारात्मक होता. शिक्षकाला समाजात मानाचे स्थान होते. प्राचीन काळी 'आचार्य' ही उपाधी शिक्षकांसाठी होती.आचार्य म्हणजे आदर्श आचरण करणारा आणि विद्यार्थ्यांकडून आदर्श आचरणाची अपेक्षा ठेवणारा.त्यामुळे बरेच विद्यार्थी डी.एड./बी.एड ला प्रवेश घेऊ लागले.परिणामीभावी शिक्षकांची संख्या वाढू लागली,पण शिक्षकांच्या नोकऱ्यांची संख्या आहे तेवढीच राहिली.

त्या काळात वृतापत्रात शिक्षक भरतीची जाहिरात दिली जायची. डी.एड./ बी.एड. पदवी धारक आपल्या विषयाची

प्रवर्गाची जाहिरात असेल, तर मुलाखतीला जात असत. त्यातूनच त्यांची निवड केली जायची. सुरुवातीला मुलाखतीला येणाऱ्यांचे प्रमाण एका जागेसाठी दहा ते बारा उमेदवार इतकं असायचं. आजमितीला हे प्रमाण सत्तर पंच्याहत्तर एका जागेसाठी इतकं असतं.त्या काळात फोन नसल्यामुळे उमेदवारांना पत्र पाठवून निवड झाल्याचे कळवले जात असे. जसजस मुलाखतीसाठी येणाऱ्यांच प्रमाण वाढू लागलं तसतसे पुढे बदल होत गेले. म्हणजेच बऱ्याच खाजगी संस्था मुलाखतीला आलेल्या उमेदवाराकडून पैशांची मागणी करत. मग ज्याला परवडेल तो उमेदवार तेवढी रक्कम देऊन नोकरी जणू विकतच घेत असे.

२००८ पर्यंत वरील पद्धतीने भरती केली गेली.त्यानंतर माध्यमिक विभागाच्या शिक्षक भरतीवर बंदी घालण्यात आली. कारण इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या वाढत्या प्रभावामुळे विध्यार्थी संख्या कमी होऊ लागली. इंग्लिश मिडीयमच्या शाळेत आपला पाल्य घालणाऱ्या पालकांचे प्रमाण वाढले, परिणामी विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरले.

२००८ ते २०१३ या कालावधित बऱ्याच खाजगी संस्थांनी अनैतिक मार्गाने शिक्षक भरती केली. त्या कालावधीत इंग्रजी, गणित, विज्ञान या विषयाचे शिक्षक भरण्या करिताच फक्त परवानगी मिळाली होती.त्यामध्ये पण विज्ञान शाखेतून पदवी धारण केलेल्या विद्यार्थ्यांना इतर भरपूर संधी उपलब्ध असल्यामुळे त्यांच्यामध्ये बी.एड.करणाऱ्यांचे प्रमाण कमी होते.परिणामी गणित-विज्ञानाच्या शिक्षकांचे प्रमाण कमी झाले होते.

**T.E.T. परीक्षेचा माउंट एव्हरेस्ट :**

T.E.T. म्हणजेच शिक्षक पात्रता परीक्षा (Teacher Eligibility Test ). शासनाने २०१३ साली पहिली ते आठवीला शिकविणाऱ्या शिक्षकांची भरती करण्यासाठी T.E.T. परीक्षेचे आयोजन केले. ती परीक्षा घेताना त्याचा पेपर अतिशय अवघड काढला होता.म्हणूनच त्याचा उल्लेख T.E.T.चा माउंट एव्हरेस्ट असा केला आहे.

महाराष्ट्र राज्यातून साडे तीन लाख परीक्षार्थी या परीक्षेकरिता बसलेहोते. त्यापैकी फक्त साडे तेरा हजार परीक्षार्थी उत्तीर्ण झाले.म्हणजेच या परीक्षेचा निकाल फक्त चार टक्के इतकाच लागला होता. हे चार टक्के विद्यार्थी खरंच गुणवत्ताधारक होते.त्यामध्ये कोणताही घोटाळा झाला नव्हता.त्यांना खरतर त्याच वेळी ऑर्डर द्यायला पाहिजे होत्या. पण शासनाने चालढकलपणा केला. वेळ काढूपणा केला. त्यापैकी काही उमेदवारांना नोकऱ्या मिळाल्या. पण त्यापैकी बरेचसे घरात बसले.तसेच ज्यांनी ही परीक्षा दिली नव्हती,तरीही नोकरीच्या ऑर्डर मिळवल्या, म्हणजेच टेबलाखालून पैसे देऊन ऑर्डर मिळवल्या.त्यांनी मग पुढे पैसे देऊनच T.E.T.पासची खोटी प्रमाणपत्रे मिळवली. शासनाने त्यांच्यावर केस टाकण्याचे नाटक केले.पण अजूनही ते सेवेत आहेत.

एखादा रोजगार करणारा रोजगारी दिवसाला ३०० रु.हजेरी मिळवतो. म्हणजे तो ९०००रु. महिना कमावतो. त्याला ते पैसे लगेच काम केल्यावर मिळत असतात. पण आमचा भावी शिक्षक बिचारा पगाराची वाट पाहत चार-पाच महिने काम करत असतो. चार-पाच महिन्यांनी मग कुठे त्याचा दोन महिन्यांचा पगार काढला जातो.म्हणजेच दोन महिने त्याने उपाशीच बसायचे होते का? बरं एवढा शिकलेला असल्यामुळे तो धड रोजगारही करू शकत नाही.

**पवित्र पोर्टल :**

**(Portal For Visible To -ll Teacher Recruitment )**

महाराष्ट्रामध्ये २०१३ साली स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षकांची भरती प्रक्रिया ही T.E.T. मधील गुणांच्या आधारे करण्यात येत होती.खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षकांची भरती प्रक्रिया ही त्या व्यवस्थापनामधील पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या मुलाखतीद्वारे होत होती.ही प्रक्रिया सदोष असल्यामुळे व त्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने २०१७ साली शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या वतीने पवित्र पोर्टलची स्थापना केली.पवित्र पोर्टलमधून स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपरिषद, खाजगी अनुदानित संस्था, अंशतः अनुदानित संस्था तसेच विनानुदानित संस्था यामध्ये शिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी पवित्र पोर्टल लागू केले आहे.दुसरीकडे अल्पसंख्याक संस्था, आदिवासी शाळा, आश्रमशाळा, समाजकल्याण विभागाच्या संस्था यांना शिक्षक भरतीकरिता स्वतंत्र अधिकार दिले गेले.

d/ B. Ed आणि TET/CTET (केंद्रीय शिक्षक पात्रता) पेपर क्रमांक १ उत्तीर्ण असायला हवी.६ ते ८ साठी D.Ed / B.Ed आणि TET/ CTET पेपर क्रमांक २ उत्तीर्ण असायला हवा..तर ९ ते १२ साठी फक्त TAIT परीक्षा उत्तीर्ण असायला हवे. त्यानंतर पवित्र पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी http :// edustaff.maharashtra.gov.in./pavitra/users/login या संकेतस्थळावर जावे लागते त्यानंतर उमेदवारांना आपली नोंदणी करून घ्यावी लागते.

पुढे संस्था संचमान्यतेनुसार रिक्त जागांचा तपशील पवित्र पोर्टलवर नोंद करतात.त्यानंतर उमेदवारांना संस्थाचे प्राधान्यक्रम

ISSN No. 2394-5990

देतात. त्यामध्ये ज्या शासनाच्या शाळा आहेत तसेच काही नावाजलेल्या संस्था आहेत त्या मुलाखतीशिवाय पदभरती करतात.तर काही संस्था उमेदवारांची निवड झाल्यानंतर त्यांची मुलाखत घेऊन मग अंतिम निवड यादी जाहीर करतात.

**पवित्र पोर्टलची सकारात्मक बाजू :**

- पवित्र पोर्टल महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षक भरतीसाठी अर्ज करण्याची ऑनलाईन सुविधा पुरवते.
- अर्जासाठी पवित्र पोर्टलवर त्यांचे खाते तयार करून विद्यार्थी सहजपणे शिक्षक भरतीसाठी अर्ज करू शकतात.
- पवित्र पोर्टलवर महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा आणि विभागातील रिक्त पदांचा संपूर्ण तपशील महाराष्ट्र शिक्षण विभाग उपलब्ध करून देणार आहे.
- राज्यातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांना पोर्टलवर शिक्षक भरतीसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.
- पवित्र पोर्टलमुळे बरेच गरजू, गरीब, होतकरू, गुणवत्ताधारक विद्यार्थी शिक्षक म्हणून पैसे न भरता नोकरी मिळवू शकले.
- पवित्र पोर्टलमुळे भ्रष्टाचाराला थोड्याफार प्रमाणात आळा घालणे शक्य झाले.
- पवित्र पोर्टलमुळे संस्थाना चांगले, गुणवत्ताधारक शिक्षक मिळण्यास मदत झाली.
- माणूस आशेवर जगत असतो, प्रत्येक D.Ed/B.Ed पदवी धारकाच्या मनात आपण शिक्षक होऊ अशी आशा निर्माण झाली.
- जो शिक्षक पवित्र पोर्टलवरून सेवेत आला आहे त्याला काढून टाकणे कुणालाही सहज शक्य नसते.
- पवित्र पोर्टल ऑनलाईन असल्यामुळे सुरवातीला गैरमार्गाचा धोका खूप कमी होता. विषय, वर्ग, आरक्षण, प्रवर्ग हा सगळा गुंता पवित्र पोर्टलमुळे सोडवणे सहज शक्य झाले.

**पवित्र पोर्टलची नकारात्मक बाजू :**

**➢ नोंदणीच्या अडचणी :-**

सुरुवातीला पवित्र पोर्टलवर नोदणी करताना विद्यार्थ्यांना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागला.उदा.जे TET पास होते, त्यांची माहिती देता येत नव्हती मग त्यांना जिल्हा परिषद ऑफीसला जाऊन ते कराव लागायचं. असे बऱ्याच जणांचे प्रॉब्लेम असल्यामुळे तिथे खूप मोठी रांग लागलेली असायची.कुणाचे मेल/फिमेल , कुणाची जन्मतारीख चुकीची,तर कुणाचे मार्क चुकीचे अशा बऱ्याच तांत्रिक अडचणी येत होत्या.

**➢ पेंडिंग कोर्ट केसेस :**

ज्यांना नोकऱ्या मिळाल्या त्याचं ठीक आहे, पण बऱ्याच जणांना मिळाल्या नाहीत, त्यापैकी काहींनी कोर्ट केस केल्या ज्यांचे निकाल दोन-तीन वर्ष लागलेच नाहीत. त्यासाठी उमेदवाराला भरपूर पैसा खर्च करावा लागला. काही केसेस तर अजून कोर्टात पेंडिंग आहेत.

**शासनाची भरती विषयक धोरणे :-**

शिक्षण क्षेत्रात होणारा भ्रष्टाचार थांबवण्यासाठी शासनाने पवित्र नावाचे पोर्टल सुरु केले.पण तेच पवित्र पोर्टल कधी अपवित्र झाले ते कुणाच्याच लक्षात आले नाही.

२०१८ साली शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी १२००० शिक्षकांची पदे भरणार असल्याचे जाहीर केले. प्रत्यक्षात मात्र खूप कमी भरली गेली.

२०१३ ला तर TET पास झाल्यावर लगेच ऑर्डर दिल्या जातील.असे सांगण्यात आले होते. पण सरकार बदललं तसं सगळंच बदललं.

जो विद्यार्थी २००८ ला डी.एड. उत्तीर्ण होतो. तोच २०१० ची सी.ई.टी.परीक्षा देतो. त्यामध्ये त्याचं नाव वेटिंग लिस्टला येतं.तोच परत २०१३ ची TET परीक्षा उत्तीर्ण होतो.पुढेTAIT देऊन पवित्रवर नोंदणी करतो. तांत्रिक अडचणीचा बळी होतो. जिल्हा परिषदेला चार-पाच फेऱ्या मारतो. पुणे शिक्षणआयुक्त कार्यालयात दोन-तीन वेळा जाऊन अर्ज देतो. ही सगळी अग्निपरीक्षा देवूनही २०२२ पर्यंत तरी त्याला नोकरी मिळालेली नसते.

सीतेसारखी अग्निपरीक्षा देवूनही त्यातून तावून सुलाखून निघाल्यावरही त्यांना वाटच पहावी लागते.त्या सीतेला जमिनीने तरी पदरात घेतलं, पण यांना वाली कोण ? वाट पाहण्यामध्ये याचं अर्धा-पाव टक्का आयुष्य खर्च करावं लागत असेल तर यासारखं दुसरं दुर्दैव नाही.

आज प्रशिक्षण घेतलेल्या डी.एड./बी.एड. धारकांपैकी जवळजवळ चाळीस ते पन्नास टक्के उमेदवार अत्यंत कमी मानधनावर काम करत आहेत.त्यांची अवस्था बिन पगारी फुल अधिकारी अशी झाली आहे.

याठिकाणी एक उदाहरण द्यावे लागेल- 'क्ष' हा शिक्षक इयत्ता नववी-दहावीला मराठी विषय शिकवतो. तो सेवेत कायम आहे.तर 'य' हा शिक्षक त्याच शाळेतील नववी-

दहावीच्या दुसऱ्या तुकडीतील विद्यार्थ्यांना शिकवतो. परंतु, तो सेवेत कायम नाही. या दोघांच्या पगाराची तुलना केली तर सेवेत कायम असलेल्या शिक्षकाला ८०००० रु.पगार तर, सेवेत कायम नसलेल्या शिक्षकाला ८००० रु. पगार. फरक वरवर पाहता फक्त एका शून्याचा आहे. दोघेही कामही तेच करतात. पण इतकी मोठी तफावत आहे की, 'य' ला अत्यंत तुटपुंज्या पगारात कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. 'क्ष' ला मात्र चांगल्या दर्जाचे राहणीमान उपभोगता येते.

ज्याच्या नोकरीची सुरुवातच भ्रष्टाचाराने झाली आहे, असा शिक्षक मुलांवर काय संस्कार करणार ! याचा विचार शासनाने देखील करायला हवा.कारण ज्या देशाची शिक्षण व्यवस्था चांगली त्या देशातील नागरिक (उद्याची पिढी) सुजाण असेल, पण ज्या देशाची शिक्षणव्यवस्था खराब तो देश मोडकळीस यायला वेळ लागत नाही.

'आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार' ही मराठीत म्हण आहे. अगदी त्याचप्रमाणे शिक्षक गुणवंत नसेल, अनैतिक मार्गाचा वापर करत असेल तर 'विद्यार्थी' घडणार तरी कसा ?

लो.टिळकांनी त्या काळात पुढील उद्गार काढले होते- सरकारचे डोके ठिकाणावर आहे का ? हेच उद्गार स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करूनसुद्धा आजही लागू होतोय.देश स्वतंत्र झाला, पण तो ज्यावेळी पूर्ण भ्रष्टाचारमुक्त होईल तेव्हाच तो खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला असं म्हणावं लागेल.अन्यथा आपल्या देशाचं भवितव्य धोक्यात यायला वेळ लागणार नाही.

**शिक्षक उद्याच्या जगाचा आधारस्तंभ :**

'इन्फोसिस' या नावाजलेल्या कंपनीच्या संचालिका डॉ.सूधा मूर्ती म्हणतात 'गाव, शाळा, विद्यार्थी, राष्ट्र यांचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास घडविण्यासाठी शिक्षक व ग्रंथालये खूप महत्वाची आहेत.'

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम म्हणतात -'शालेय जीवनात शिक्षक हा खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा आदर्श असतो'.

३ डिसेंबर,२०२० रोजी सोलापूरच्या श्री.रणजितसिंह डिसले यांना मवैश्विक शिक्षक पुरस्कार मजाहीर झाला. श्री. डिसले सरांनी आपल्याला मिळालेल्या पारितोषिकाची रक्कम कुशलतेने वाटली. आणि पुन्हा एकदा संपूर्ण विश्वाला भारतीय संस्कृतीचे दर्शन झाले.त्यांना पाठ्यपुस्तकातील क्यू.आर. कोडसाठी हा पुरस्कार जाहीर झाला होता.एक शिक्षक काय करू शकतो याचं उत्कृष्ठ उदाहरण म्हणजे श्री.डिसले सर होय.

शिक्षकाला शासनाकडून नोकरीचं कवच हवं आहे. नोकरीची सुरक्षितता हवी आहे.

एक चांगला शिक्षक अनेक पिढ्या घडवण्याच पवित्र काम करत असतो. पण जर तोच अनैतिक मार्गाचा अवलंब करून नोकरी मिळवत असेल तर त्या पिढ्या त्याच्या हातून कशा बरं घडू शकतील ? शासनाने देखील शिक्षकांवर अनैतिक मार्गाचा अवलंब करण्याची वेळच येवू देवू नये.

आज डी.एड./बी.एड. ची कॉलेज बंद व्हायला लागली आहेत. कारण मागच्या बारा वर्षांपासून शिक्षकाची नोकरी मिळण्याची वाट पाहणारे उमेदवार पाहून त्यांची उमेदच निघून जाते.

शिक्षक हा समाजाचा आरसा आहे. कोणत्याही देशाला उत्तम नागरिक मिळवून देण्याचं काम शिक्षकच करीत असतो. देशाचं भवितव्य शाळांमधूनच तर घडत असतं, म्हणूनच शिक्षक उद्याच्या जगाचा आधारस्तंभ आहे असं म्हणावं लागेल. विद्यार्थी देखील पुढे जाऊन शिक्षकांचच अनुकरण करत असतात.

**समारोप :**

सगळ्या परिस्थितीचा एकंदर विचार करता वेळच्या वेळी शिक्षकांची भरती केली तरच हा प्रश्न सुटेल. परीक्षेमध्ये जे जास्त मार्क्स मिळवतील त्यांना संधी द्यायला हवी. भरती पूर्ण झाली हे लक्षात येताच बाकीचे उमेदवार ज्यांना कमी मार्क्स मिळाले होते.ते अजून तयारी करून मार्क्स वाढवण्यासाठी प्रयत्न करतील. ज्यांना मार्क्स वाढवायला, अभ्यास करायला करायला जमणार नाही ते दुसर एखाद क्षेत्र निवडतील, दुसरी नोकरी शोधतील, त्यांच्या आयुष्यातील वर्षं वाया जाणार नाहीत.

**निष्कर्ष :**

१. शासनाने खोटी आश्वासने देवू नयेत. म्हणजेच जर बारा हजार जागा भरणार सांगितलं तर बारा हजार जागांची भरती करायलाच हवी.
२. ही भरती करताना नियोजनबद्धपणे करायला हवी
३. अनैतिक मार्गाचा अवलंब कोणत्याही प्रकारे केला जाणार नाही याची काळजी घ्यायला हवी.
४. गुणवत्ताधारकांना योग्य प्रकारे न्याय द्यायला हवा.
५. सरकार बदलले तरी त्यांनी शिक्षक भरतीची सुरु असलेली प्रक्रिया पुढे तशीच चालू ठेवायला हवी.
६. संच मान्यतेनुसार, आरक्षण, प्रवर्ग, वर्ग, विषय, याचा गुंता होणार नाही याची काळजी घ्यायला हवी.

ISSN No. 2394-5990

७. पवित्र पोर्टलवर नोंदणी करताना नोंदणी कशी करावी ? त्याबद्दल माहिती देणारा फ्लो चार्ट द्यायला हवा जेणेकरून कोणतीही तांत्रिक अडचण उद्भवणार नाही.

८. उमेदवारांनी प्रामाणिकपणे आपली सर्व माहिती पवित्र पोर्टलवर भरायला हवी.

संदर्भ :-


१. http:edustaff.maharashtra.gov.in.

३. http://www.adda247.com

४. शिक्षण संक्रमण मासिक अंक नोव्हेंबर २०२१ लेखक –महादेव इरकर –शिक्षक विद्यार्थ्यांसाठी पूरक व अवांतर वाचन पृष्ठ –२६,२७

५. शिक्षण संक्रमण मासिक अंक डिसेंबर २०२१ लेखिका –अंजली गोरेगावकर –नवीन शैक्षणिक धोरण माझी भूमिका पृष्ठ –५


■■■

Education through self help is our motto - Karmaveer



Rayat Shikshan Sanstha's

# Shri. Raosaheb Ramrao Patil Mahavidyalaya, Savlaj



Tal.- Tasgaon, Dist.- Sangli-416 311(Maharashtra) Affiliated to Shivaji University, Kolhapur

(Accredited 'B+' Grade with CGPA - 2.72 in the Third Cycle of NAAC)

Department of History & IQAC
in collaboration with
Shivaji University History Conference, Kolhapur

Indian Council of
Social Science Research

organizes
ICSSR, New Delhi Sponsored
Two Days National Level Seminar
on

## 'Subaltern Movements in India: Issues & Challenges'

18th & 19th January 2024

# Certificate

This is to certify that Prof./Dr./Mr./Ms. प्रा. सुनिता भारत शोरवाले of डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर has participated in the seminar as Key-note Speaker/ Resource Person/ Chairperson/ Participant. He/She has presented a research paper entitled शिक्षक भरती प्रक्रिया सद्यस्थिती

**Dr. S. V. Panade**
Coordinator IQAC

**Dr. S. B. Babare**
Oraganizing Secretary

**Prin. Dr. K. H. Shinde**
Convener